Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849429

# मराठी कवितेचा परीघ विस्तारणारी स्त्री जाणीव

- डॉ. समाधान चंद्रभागा भिवसन इंगळे[1]

'स्त्री-मुक्ती' हा मानवमुक्तीचा एक केंद्रवर्ती घटक स्त्रीवादी साहित्यातून सातत्याने अधोरेखित झालेला आहे. जोपर्यंत स्त्री मुक्त होत नाही तोपर्यंत पुरूषही मुक्त होऊ शकत नाही, हे सत्य आता नव्या काळाच्या टप्प्यावर स्वीकारावे लागणार आहे. स्त्रीला बंदिस्त करणारी पुरुषसत्ताक चौकट एक प्रकारे पुरुषांचीही मर्यादाच अधोरेखित करते. स्त्रीवर 'स्त्री' म्हणून वेगळे जगण्याची - वागण्याची मर्यादा लादली तर पुरुषालाही 'पुरुष' म्हणून वर्तनाच्या मर्यादा आपसूक निर्माण होतातच. स्त्री-पुरुषांच्या शरीरातील कमी-अधिक हार्मोन्समुळे स्त्री आणि पुरुषांच्या वर्गवारीत आता नवीन वर्ग घटक आपले स्थान मिळवण्यासाठी आग्रही झाला आहे. तरीही आपण 'स्त्री' आणि 'पुरुष' म्हणूनच ओळख ठेवणार असू तर हे मागासलेपणाचे लक्षण आहे. आणि या मागासलेपणाचे सर्व श्रेय तमाम पुरुष जमातीला आहे. जुन्या काळातील किंवा प्राचीन काळातील रूढी परंपरा यांच्या नावाने आपण वर्तमानाला बाधित होऊ देऊ शकत नाही. कारण आपण 'जुने जाऊ द्या मरणालागुनी' या अर्थाने अनावश्यक सगळ्या रूढी-परंपरा बाद केल्या आहेत. मात्र स्त्रियांविषयीची जाणीव एवढ्या प्रगत काळातही बाद होत नाही, याचे कारण आपण 'फायदे आणि तोटे' या व्यवहारी नजरेतून पहायला हवे. स्त्रियांच्या कवितेला 'स्त्री' म्हणून केंद्रित करणे किंवा तशी मर्यादा स्त्रियांच्या अभिव्यक्तीतून उमटणे हे मागास मानसिकतेच्या समाजाचे लक्षण आहे.

जगाच्या पाठीवर स्त्री-पुरुष असा शारीरिक शिक्का असला तरी कार्यकर्तृत्व याविषयी स्त्रियांना वेगळी ओळख आणि वागणूक नाही. ज्या देशांच्या, प्रगत समाजाच्या जीवनशैलीची आपण भ्रष्ट नक्कल करीत आहोत त्या देशांनी आणि समाजांनी स्त्रीला वस्तू म्हणून मानणे केव्हाच बंद केले आहे. मात्र आपल्या देशातील आणि आपल्या भोवतालच्या देशातील मानव नर अधिक उग्र आणि उद्धट झालेला आहे. या अनुषंगाने प्रातिनिधिक संदर्भ म्हणून 'प्रिय हा कण गॉड पार्टिकल आहे' हा  कवितासंग्रह घेतला आहे.

२०२२ च्या मध्यावर प्रकाशित होणाऱ्या 'प्रिय हा कण गॉड पार्टिकल आहे' या कविता संग्रहामुळे भारतीय मनुष्य नर माणूस होण्याच्या प्रक्रियेत अजूनही मागासच असल्याचे दिसते. खरेतर मानव समूहाच्या निर्मितीतील 'गॉड पार्टिकल' बिंदू फक्त स्त्रीच आहे. मात्र हे श्रेयही कवयित्री आशा डांगे 'प्रिय' या लडिवाळ बोलीतून त्याला समावेशी बनवण्याचा उद्गार करते. निसर्गानेच स्त्री-पुरुष यांच्यातील भिन्नता देहाच्या माध्यमातून ठरवली. मात्र 'मानव' ही निसर्गाची निर्मिती नसून या भूतलावरील एका प्राणी घटकाने स्वतःची म्हणून एक वेगळी संस्कृती निर्मित करून त्याचे अस्तित्व सिद्ध केले आहे. त्यामुळे इतर प्राण्यातील नर आणि मनुष्य प्राण्यातील नर यांच्यातील साम्य दाखविणे म्हणजे मानवाच्या सांस्कृतिक व्यवहारालाच आव्हान देणारे ठरेल.

आपल्याला असे लक्षात येते की, भारतीय स्त्रियांची अभिव्यक्ती ही 'स्त्री' जाणिवांच्या नावाखाली व्यक्त होता होता पुरुषांच्याच व्यवहाराच्या भोवती फिरत राहते. मात्र आशा डांगे यांची कविता संघर्षाऐवजी समन्वयाची, उपरोधाची भाषा बोलते. 'कांतासंमित

[1] मराठी विभाग प्रमुख, र. भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई, जि. बीड

तयोपदेशयुजे' या मम्मटांच्या प्रयोजनाप्रमाणे पुरुषसत्तेचे मन परावर्तित करण्याचा प्रयत्न करते. मात्र 'भारतीय पुरुष एकवेळ पश्चाताप करेल पण प्रेमळ होणार नाही' असाच घडवलेला असल्याने त्याची गुन्हेगारी वृत्ती आणि अत्याचाराची अहंकार भावना तो जपून आहे. केवळ स्त्रियाच नव्हे तर देशासमोरील आणि देशाच्या सर्वांगीण प्रगतीत ही एक मोठी समस्या आहे. व्यसनाधीनता, आक्रमकता, वर्चस्वता आणि गुन्हेगारी या पद्धतीने मार्गक्रमण करणाऱ्या पुरुषी सत्तेचा समाचार ही कविता घेते.

ती स्त्रीधर्म म्हणून ती सगळे भोगते, पचवते, सोसते अन् क्षमाही करते. मात्र तिच्या मानवधर्म म्हणून स्वीकार करण्याच्या अपिलाकडे कायमच दुर्लक्ष झालेले आहे.

क्षमा करण्यासाठी फार सामर्थ्य लागते. आणि ते भारतीय स्त्रियांच्या स्वभावात ठासून भरलेले आहे. त्यामुळे भारतीय स्त्रीवाद हा जगाच्या स्त्रीवादाच्या तुलनेत अनावश्यक एवढा समंजस आहे. चीन - जपान सारख्या अनेक देशात महिलांनी 'विवाह' आणि 'पुरुष' दोन्हीनाही नाकारले. गुलामी लादणारी 'विवाह' ही संस्था आणि 'पुरुष' हा जोडीदार यांना तेथील स्त्रियांनी बाद केल्याने त्या देशांच्या सरकारांसमोर वेगळीच समस्या निर्माण झाली आहे. मात्र भारतात आजही स्त्रियांवरील बलात्कार, शारीरिक - मानसिक पीडा देण्याचे प्रमाण सरसकट असूनही 'भारतीय संस्कृती' या  शिर्षकाखाली सगळे अमानुष आदर्शवत असल्यासारखे खपून जात आहे.

'माझ्यातील 'ती' वेळ प्रसंगी होत असते पुरुषी' या ओळीने तर थबकल्यासारखे आणि हबकल्यासारखे होते. 'पुरुषी असणं माझ्यासाठी अभिमानास्पद. त्याचं बायकी असणं त्याच्यासाठी लज्जास्पद' ही ओळ भारतीय स्त्री - पुरुष तुलनेची कोंडी फोडायला प्रेरक ठरू शकते. शारीरिक हार्मोन्समध्ये कुठलाही बदल न करता आपल्याला संवेदनांच्या पातळीवर 'त्या'ने थोडे 'ती' व्हायला पाहिजे आणि 'ती'ने थोडे 'तो' व्हायला पाहिजे. म्हणजे सीमेवर मानवतेचे दर्शन होईल. आणि संगीतात ज्याला 'सम' म्हणतात त्या समेवर येता येईल.

आशा डांगे आणि सध्याच्या लिहिणाऱ्या सर्वच कवयित्रींनी अभिव्यक्तीतील 'मर्यादा स्त्रियोत्तम' ओलांडायला पाहिजे. आशा डांगे यांच्या लिंगभाव नसलेल्या कविता या अभिव्यक्तीचा निखळ अविष्कार वाटतात. जवळपास स्त्रिया या आपल्या कथा, कविता, नाटक, कादंबरी आदी प्रकारातून स्त्रीकेंद्री मांडणी करतात. याचा अर्थ पुरुषांना दुःख किंवा वेदना नाहीच असा होत नाही. मात्र कुठलाही पुरुष आपण पुरुष असल्याच्या दुःखाच्या डोहात बुडालेला दिसत नाही. त्याच्या दुःखाला - शोषणाला त्याचे पुरुषपण जबाबदार असूच शकत नाही, असेही नाही. मात्र तो अधिक वैश्विक होतो. स्त्रीमुक्तीचा लढा आपल्याकडे अभिव्यक्तीच्या पातळीवरच जास्त लढला गेला. जो आभासी आहे. तो सामाजिक पातळीवर, न्यायीक पातळीवर, राजकीय पातळीवर अधिक तीव्र व्हायला पाहिजे. मात्र ते आपल्या समाजात, देशात घडत नाही. आशा डांगे यांच्या कवितेतील 'गॉड पार्टिकल' जर काय असेल तर ती त्यांची 'कवी' म्हणून असलेली काव्याभिव्यक्ती आहे. कवितासंग्रहातील 'मी मात्र', 'शहर', 'उत्खनन', 'शहरभर विखुरलेले शब्द' या कविता मराठीतील एका उत्तम कवितेची नोंद घ्यायला भाग पाडणाऱ्या आहेत.

आशा डांगे यांनी 'तो - ती' मधील विसंवाद 'लोक वैयक्तिक समजतील' या दडपणातून न लिहिता (कारण, मराठीत लिहिणाऱ्या बहुतेक स्त्रियांना लेखनाचे स्पष्टीकरण देताना हे माझे खासगी नाही असे सांगावे लागते) अगदी खुलेपणाने लिहिले पाहिजे. त्यांच्या

कवितेत ती ताकत आहे. मराठीतील कवयित्रींमध्ये शंभर पैकी फक्त एखादीच लग्नानंतर आपली अभिव्यक्ति जोपासू शकते. बाकी फक्त व्यक्ती होऊन जातात. त्यामुळे लिहिण्याची धमक आणि अवकाश असणाऱ्या स्त्रियांनी लिहिले पाहिजे. स्त्रियांनी व्यक्त होणे हाच मुळात विद्रोह आहे. भारतीय स्त्रियांच्या अभिव्यक्तीत एखाद्या इझमचा प्रभाव नसला तरी तिच्या स्वाभाविक आणि ओघवत्या निर्मितीला वैचारिक बळ मिळतं. भारतीय महिलांचं आयुष्य एवढं विविधांगी आहे, आणि तेच या कविता संग्रहातून ठळकपणे लक्षात येतं.

आपल्याकडे एक नवरा मृत्यूपत्र तयार करताना लिहितो की, माझ्यानंतर माझ्या पत्नीला विधवा होण्याच्या अनिष्ट प्रथेला सामोरे जावे लागू नये. ही बातमी समाज माध्यमातून प्रचंड व्हायरल होते. गावोगावीचे लोक त्याचे समर्थन करतात. सरकारला ते मनावर घ्यावे लागते. खरं म्हणजे हे एका बाईने सांगायला पाहिजे. आणि जगातल्या तमाम पुरुषांनी ते मान्य करायला पाहिजे. सरकारांनी तसे कायदे करायला पाहिजे. मात्र आपला समाज स्त्रियांच्या जगण्याकडे निकोप बघायला शिकण्यासाठी अजून काही काळ जावा लागणार आहे. 'दिवस उजाडतो आणि एक कविता विझून जाते डोळ्यात माझ्या' अशाप्रकारे न जन्मलेल्या कवितेला आवाज बनविण्याची ताकद असलेली अशा डांगे यांची कविता आहे. त्यांनी टाळता येण्यासारखा सांकेतिकपणा शिंपल्याप्रमाणे टाळावा. त्यांचे शब्द आणि काव्यप्रतिमा मोत्यासारख्या मौलिक आहेत. 'आयुष्यभर वैशाखवणवा असला तरी तू कशी भासतेस नेहमीच श्रावणातल्या या कोवळ्या उन्हात न्हाल्यासारखी नेहमीच' स्त्री जीवनातील साकारात्मकता अचूकपणे टिपणारी ही दुर्मिळ काव्यदृष्टी आहे. 'परिघाबाहेर'ची ओळख असलेली त्यांची कविता मराठी कवितेचा परीघ विस्तारणारी आहे. समकालीन फक्त स्त्री अभिव्यक्तीचाच नाही तर मध्यवर्ती आशय सूत्रांना गुंफणारा हा 'गॉड पार्टिकल कण' आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१. पॅम डेनी/ ल्युसिंडा बेकर, संशोधन प्रस्ताव विकसित करणे, २०१२, सेग भाषा, नवी दिल्ली

२. चव्हाण रा. ना., विचार-दर्शन, २०१६, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

३. पाटील लीला, मराठीचे अध्यापन व मूल्यमापन, १९७८, व्हीनस प्रकाशन, मुंबई

४. जोशी वसंत स. भाषा व साहित्य संशोधन खंड पहिला, द्वितीय आवृत्ती २००६, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे

५. मराठी दलित कविता - संपा. बी. रंगराव, प्रकाशन- साहित्य अकादमी, नवी दिल्ली

६. मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, प्राचीन खंड, प्र. न. जोशी, प्रकाशन- नितीन प्रकाशन, पुणे

७. दलित कविता आणि प्रतिमा - महेंद्र भवरे- प्रकाशन- लोकवाङ्मय गृह, मुंबई

८. मराठवाड्यातील साहित्य - संपा. प्रल्हाद जी. लुलेकर/ सतीश बडवे.

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*